गाव तिथे प्रतिनिधी
नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ३८ वा ● सोमवार २४ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 38 | Date : 24/06/2024 blow Monday Page 4 Price 4

## वादळी चर्चेची चिन्हे; १८व्या लोकसभेचे पहिले अधिवेशन आजपासून


### विरोधकोंचे संख्याबळ वाढल्याने सरकारची परीक्षा

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

१८व्या लोकसभेचे पहिले संसद अधिवेशन आज, सोमवारपासून सुरू होणार आहे. पहिले दोन दिवस सदस्यांचा शपथविधी झाल्यानंतर बुधवारी, २६ जून रोजी लोकसभा अध्यक्षांची निवड होणार आहे. ही रालोआ सरकारची पहिली परीक्षा ठरेल. २७ तारखेला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे अभिभाषण होईल. केंद्र सरकारने केलेल्या हंगामी अध्यक्षांच्या निवडीवरून अधिवेशनापूर्वीच वाद उफाळून आला आहे. त्यातच लोकसभेत विरोधकांचे संख्याबळ आधीच्या दोन कार्यकाळांपेक्षा अधिक झाल्याने सरकारची कसोटी लागणार आहे.

सरकारने हंगामी अध्यक्ष म्हणून भाजपचे वरिष्ठ सदस्य भर्तृहरी महताब यांची निवड केली आहे. ते सातव्यांदा लोकसभेवर निवडून आले आहेत. मात्र आठ वेळा निवडून आलेल्या काँग्रेसच्या के. सुरेश यांना डावलण्यात आल्याचा आरोप विरोधकांनी केला.

*** २४ जून, सकाळी ११ वा. : संसद अधिवेशनाला सुरुवात**
*** २४ आणि २५ जून : सदस्यांचा शपथविधी**
*** २६ जून : लोकसभा अध्यक्षांची निवड**
*** २७ जून : राष्ट्रपतींचे अभिभाषण**
*** २८ जून : राष्ट्रपतींचे आभार मानणारा प्रस्ताव**
*** ०२ किंवा ३ जुलै : प्रस्तावाला पंतप्रधान मोदी यांचे उत्तर**
*** त्यानंतर अधिवेशनाला काही दिवसांची सुट्टी असेल. २२ जुलै रोजी अर्थसंकल्पासाठी पुन्हा अधिवेशन सुरू होईल.**



कुलस्ते यांच्यासह काँग्रेसच्या सुरेश, द्रमुकचे टी. आर. बालू व तृणमूल काँग्रेसच्या सुदीप बंडोपाध्याय यांचा समावेश आहे. रविवारी संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी बंडोपाध्याय यांची भेट घेऊन त्यांना भूमिका समजावून महताब यांना सहकार्य करण्यासाठी राष्ट्रपतींनी नेमलेल्या समितीमध्ये काम न करण्याची भूमिका 'इंडिया'तील पक्षांनी घेतली आहे. या समितीमध्ये भाजपचे राधामोहन सिंह व फग्गनसिंह देण्याचा प्रयत्न केला. सुरेश १९९८ आणि २००४ अशा दोन निवडणुकांमध्ये पराभूत झाले होते, तर महताब सलग सातव्यांदा निवडले गेल्याचा दावा त्यांनी केला आहे. मात्र यावरून विरोधकांचे समाधान झाले नसून त्यांची बहिष्काराची भूमिका कायम राहिली आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी या वादाचे पडसाद उमटण्याची चिन्हे आहेत.

अधिवेशनाचे कामकाज सुरू होण्यापूर्वी, सोमवारी सकाळी महताब यांना राष्ट्रपती भवनावर हंगामी लोकसभा अध्यक्षपदाची शपथ दिली जाईल. सकाळी ११ वाजता लोकसभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर सभागृह नेते या नात्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सर्वप्रथम शपथ दिली जाईल. त्यानंतर राष्ट्रपतींनी हंगामी अध्यक्षांच्या मदतीसाठी नेमलेल्या समितीसदस्यांचा शपथविधी होईल. त्यानंतर मंत्रिपरिषदेचे सदस्य आणि शेवटी आद्याक्षरांच्या क्रमानुसार प्रत्येक राज्यातील सदस्याला शपथ दिली जाईल. २६ तारखेला लोकसभा अध्यक्षाची निवड होणार आहे. आधीच्या दोन्ही कार्यकाळांमध्ये उपाध्यक्षपद रिक्त ठेवण्यात आले होते. हे पद विरोधी पक्षांकडे असावे, असा संकेत असल्याने 'इंडिया' । **पान २ वर**

## नोव्हेंबरनंतर महाराष्ट्रात आपलाच मुख्यमंत्री

### संजय राऊत यांचं मोठं विधान...

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

खासदार संजय राऊत यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेची तोफ म्हणून ओळखलं जातं. नाशिकमध्ये आज त्यांनी जोरदार भाषण केलं आणि नोव्हेंबरनंतर मुख्यमंत्री आपलाच होणार अशी घोषणाही करुन टाकली. संजय राऊत यांच्या या वक्तव्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. राज्यात आणि देशात लोकसभा निवडणूक झाल्यानंतर चार विधानपरिषद निवडणुकांची घोषणा झाली आहे. नाशिक मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार संदीप गुळवेंच्या प्रचारासाठी शिवसेनेचा मेळावा पार पडला. त्यावेळी संजय राऊत यांनी हे वक्तव्य केलं आहे.



मुंबईतला आमचा अनुभव वाईट आहे. आम्ही राजकारणातले लोक आहोत, आम्ही हेराफेरी करतो, मतदार आणतो, बसवतो. लोका सांगे ब्रह्मज्ञान, स्वतः कोरडे पाषाण अशी अवस्था आहे. बोगस शिक्षक, बोगस शिक्षकेत्तर कर्मचारी यांची नोंद झाली आहे. अशा लोकांना शोधून त्यांच्यावर खटले दाखल झाले पाहिजेत. असं संजय राऊत म्हणाले. तसंच मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या नाशिक दौऱ्यावरही त्यांनी टीका केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाशिक दौऱ्यावर आहेत, पण त्यांचा आणि शिक्षणाचा काही संबंध आहे का? दोन, अडीच वर्षांत शिक्षणासंबंधी ते कधी काही बोलले का? त्यांचा उमेदवार म्हणतो आण्ही शिक्षकांना गुलाम बनवू. शेतकरी आणि शिक्षक महाराष्ट्रात या सरकारच्या कार्यकाळात समाधानी नाही. शिक्षकी पेशाला देशात मान-सन्मान होता आता मात्र तो दिसत नाही. शिक्षक मतदारसंघाची निवडणूक सोपी नाही. ५४ तालुक्यांचा हा मतदारसंघ आहे. राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेपेक्षा तुमची यात्रा मोठी आहे. असंही संजय राऊत म्हणाले.

शिक्षण क्षेत्र आणि शाळेशी संबंध नसलेले राज्यकर्ते लाभले म्हणून आपल्याला शिक्षण क्षेत्रातही। **पान २ वर**

## दुधनी रेल्वे स्टेशन येथील किराणा दुकान आगीत जळून खाक , सहा ते सात लाखाचे नुकसान

**दुधानी/दैनिक यशसिध्दि न्यूज**



दुधनी येथील रेल्वे स्टेशन परीसरात भिमाशंकर कल्याणशेट्टी यांच्या मालकीचे किराणा दुकान असून दररोज प्रमाणे रात्री दुकानात सामान व्यवस्थित ठेऊन लाईट बंद करून कुलुप लाऊन घरी गेले होते . मध्यरात्री सुमारे एक ते दोन दरम्यान दरम्यान दुकानात आग लागली होती . त्याच वेळेस दुकानाच्या बाजुस माजी नगरसेवक सोमण्णा ठक्का हे शौचालयास उठले होते . आणि त्याच दरम्यान हैद्राबाद एक्सप्रेस दुधनी रेल्वे स्थानकावरून जात असताना प्रवाशांनी आरडा ओरड केल्याने नागरीक जागे झाले . तो पर्यंत आग मोठया प्रमाणात लागली होती . अथक तीन तासाच्या प्रयत्नानंतर आग विझवण्यात आले .

## शेतजमिनीच्या मोजणीच्या वादातून शेतकऱ्याचा खून; भाऊ गंभीर जखमी

सोलापूर/प्रतिनिधी : शेतजमिनीची शासकीय मोजणी करण्यास हरकत घेऊन दोघा शेतकरी बंधुंवर लोखंडी पाईपने प्राणघातक हल्ला करण्यात आला. यात एकाचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. याप्रकरणी दहा ते अकराजणांविरूध्द पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ही घटना बाळे येथे घडली.




पुरूषोत्तम ऊर्फ खंडू दिगंबर बन्ने (वय ४०, रा. पत्र्याची तालीम, उत्तर कसबा, सोलापूर) असे खून झालेल्या शेतक-याचे नाव आहे. त्यांचे बंधू देवीदास बन्ने (वय ४२) हेसुध्दा या हल्लयात गंभीर जखमी झाले आहेत. यासंदर्भात जखमी देवीदास बन्ने यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार शांतप्पा आडके, सागर आडके आणि बाळू आडके (रा. देगाव, सोलापूर) यांच्यासह त्यांच्या सात ते आठ साथीदारांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.मृत पुरूषोत्तम ऊर्फ खंडू बन्ने व त्यांचे बंधू देवीदास बन्ने यांच्या मालकीची बाळे शिवारात शेतजमीन आहे. त्यांच्या शेतालगत आडके कुटुंबीयांची शेती आहे. परंतु शेतजमिनीच्या हद्दीवरून त्यांच्यात वाद होता. दरम्यान, हद्दीचा वाद मिटविण्यासाठी बन्ने बंधुंनी आपल्य शेतजमिनीची शासकीय मोजणी करून घेण्याचे ठरविले. त्यानुसार शेतात शासकीय यंत्रणेमार्फत शेतजमिनीची मोजणी सुरू असताना त्यास आडके कुटूंबीयांनी जोरदार हरकत घेतली. शेताची मोजणी करायची नाही. अन्यथा एकेकाला खलास करू, असे म्हणत आडके कुटुंबीयांसह त्यांच्या साथीदारांनी बन्ने बंधुंवर लोखंडी पाईपने जीवघेणा हल्ला केला. यात पुरूषोत्तम ऊर्फ खंडू बन्ने यांचा मृत्यू झाला. तर देवीदास बन्ने हे गंभीर जखमी झाले.

## मराठा महासंघाची बैठक संपन्न

### जरांगेंना पाठिंबा, फडणवीसांचं कौतुक, भुजबळांवर टीका, मराठा नेत्यांवर हल्लाबोल

**नागपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज** : अखिल भारतीय मराठा महासंघाला पुढच्या वर्षी १२५ वर्षे पूर्ण होत असताना आज



मराठा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची एक बैठक नागपुरात पार पडली. या बैठकीनंतर मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिलीप जगताप यांनी विविध विषयांवर प्रतिक्रिया दिली. त्यामध्ये, मराठा आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या मनोज जरांगे यांना आपला पाठिंबा असल्याचं जगताप यांनी म्हटलं. तर, ब्राह्मण नेत्यांकडूनच मराठा समाजाला भरपूर मिळाले, मराठा नेत्यांकडून अपेक्षाभंग झाल्याचंही त्यांनी म्हटलं. मराठा आरक्षण, छगन भुजबळ विजय वडेट्टीवार, मनोज जरांगे, मराठा नेते आणि देवेंद्र फडणवीस यांसह विविध मुद्द्यांवर जगताप यांनी भाष्य केलं.

आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा वाढवा, ही आमची पूर्वीपासूनची मागणी असून पटेल, जाट, । **पान २ वर**

## शरण जिरगे यांनी जपला वृक्षसंवर्धनाचा वसा

### भूमिपुत्राने दिले गोगांव गावास विविध प्रकारचे झाडे भेट






**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुळचे गोगांव ता. अक्कलकोट येथील रहिवाशी सध्या पुणे येथे राहण्यास असलेले शरण तीपणा जिरगे यांनी गावाकडे आलेले ओढ,प्रेम, आपुलकी निमित्त गावाला काहीतरी देणं लागतो या विचाराने प्रेरित होऊन यंदाच्या यात्रेच्या वेळी उन्हात लागलेले चटके यांची विचार करून यात्रेच्या वेळी वर्ग मित्र उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांना दिलेले शब्द पाळत गावामध्ये विविध प्रकारचे १०१ झाडे ग्रामपंचायतीस भेट दिले आहे

सदर कार्याचा गावासह परिसरात कौतुक होत आहे विविध प्रकारचे झाडे हे आरोग्य उपकेंद्र , जिल्हा परिषद शाळा, डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर, शाळेपासून गावापर्यंत झाडे लावण्यात आले यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, डॉ लिंगराज नडगेरी, आरोग्यसेविका अंबिका वळसंग, ग्रा. प. सदस्य शरणपा कलशेट्टी, मुख्याध्याक दयानंद चोळे, पुंडलिक वाघमारे, शंकर कारभारी किरण गायकवाड, काही झाडे गावकऱ्यांना लावण्यासाठी देण्यात आले झाडे लावा झाडे जगवा परिसर ऑक्सीजनमय ठेवा उन्हाळ्यामध्ये उन्हाचे चटके पासून बचाव करायचं असेल तर प्रत्येकानी एक झाड लावून त्याची पालन पोषण करावे असे आव्हान उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी केले

## वृक्ष संवर्धन चळवळ काळाची गरज: आ. समाधान आवताडे

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

वाढत्या औद्योगिक कारणामुळे दिवसेंदिवस पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे त्यामुळे तापमानात वाढ होऊन पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे तो थांबवण्यासाठी वृक्ष लागवड करून संवर्धन करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी व्यक्त केले आहे. मंगळवेढा येथील उदयसिंह मोहिते पाटील इंग्लिश मीडियम स्कूल येथे आयोजित तालुक्यातील मुख्याध्यापक सहविचार सभा या कार्यक्रमाप्रसंगी आमदार अवताडे हे बोलत होते यावेळी व्यासपीठावर पंचायत समिती गटविकास अधिकारी योगेश कदम जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर माजी संचालक राजन पाटील शिक्षणाधिकारी डॉक्टर बिभीषण रणदिवे डॉक्टर नंदकुमार शिंदे प्राचार्य सुधीर पवार आणि मान्यवर उपस्थित होते पुढे बोलताना आमदार




अवताडे यांनी सांगितले की मंगळवेढा तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांची एकूण संख्या ४१००० हजारांच्या आसपास असून विद्यार्थी संख्या एवढी झाडे आपण तालुक्यातील सर्वच शाळा मार्फत वृक्षारोपण करण्याचा संकल्प हाती घेतला आहे त्यामुळे वृक्ष लागवडीची ही चळवळ लोकसभागातून गतिमान करून जास्तीत जास्त झाडे लावण्याचे अभियान तालुका वर दिसणार आहे पृथ्वीवरील प्रत्येक संजीवाला जगण्याचा अधिकार आहे

मंगळवेढा शहर व तालुक्यातील विविध सामाजिक संस्था शासकीय यंत्रणेमार्फत पर्यावरण संवर्धन काम करण्यात येत आहे त्यामुळे पर्यावरणाची काळाची गरज आहे प्रत्येकाची कर्तव्य आहे शालेय जीवनातील विद्यार्थ्यांच्या मनावर आनंदी व आरोग्यमय जेवण जगण्याची संकल्पना रुजवण्यासाठी आपण सर्वांनी आपल्या दैनंदिन अध्यापन कर्तव्य सेवेच्या संवेद पर्यावरण पूरक आणि पोषक या मोहिमेमध्ये उस्फूर्त सहभाग नोंदवला ते गरजेचे आहे । **पान २ वर**

दैनिक
यश सिद्धि न्यूज
सोमवार दि.२४ जून २०२४


# संपादकीय

## संवेदना गोठल्याचे निर्दशक..

वसईत घडलेली घटना तर माणुसकीला शरमेने मान खाली घालायला लावणारी आहे. सहा वर्षे जिच्यावर जिवापाड प्रेम केले, तिच्याच डोक्यात पान्याचे घाव घालताना प्रियकराचा हात थरथरला नाही. पोलीस तपास होईल, त्यामागचे निश्‍चित कारणही समोर येईल. पण अनावर झालेल्या रागाने एका निष्पाप तरुणीचा बळी घेतला त्याचे काय? संबंधांमध्ये वितुष्ट जरी आले तरी, ते सामंजस्याने किंवा दुसऱ्या एखाद्या जबाबदार व्यक्तीच्या मध्यस्थीने त्यातून मार्ग काढता येऊ शकतो, असा विचार तो करू शकला नाही, हे खेदजनक आहे. गैरसमज आणि संशय हे दोन व्यक्तींमधील संबंधाचे मोठे शत्रू असतात, ते दबा धरून बसलेले असतात, त्यांच्यापासून दोघांनी फार सावध राहावे लागते. अव्यक्त प्रेम आणि अतिरेकी प्रेम याचा शेवट असा भयावह होऊ शकतो, याचा प्रत्यय अनेकदा आला आहे. वसई पूर्वेच्या वालीव येथे आरती यादव या २२ वर्षीय तरुणीची २९ वर्षीय रोहित यादव याने भर रस्त्यात केलेली हत्या अतिरेकी प्रेमाचे स्पष्ट उदाहरण आहे. साधारणपणे दोन वर्षांपूर्वी नवी दिल्लीत श्रध्दा वालकर हिची हत्या असो वा गेल्यावर्षी मीरा रोड येथील सरस्वती वैद्य हिची हत्या असो, या घटनाही त्याच पठडीतील आहेत. आपल्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो, याची पुसटशीही कल्पना श्रध्दा, सरस्वती आणि आरती यांना आली नसावी का? तसे संकेत मिळाले असतील तर, मग त्या सावध का झाल्या नाहीत? या नाण्याची दुसरी बाजू ही की, आता नकार पचविणेसुध्दा जड होत चालले आहे. मुलीकडून नकार येताच, पुरुषी अहंकार जागा होतो आणि त्याचे पर्यवसान गंभीर गुन्ह्यातच होते. कल्याणमध्ये एका २५ वर्षीय तरुणाने एकतर्फी प्रेमातून बारा वर्षीय मुलीची हत्या केली. सर्वात गंभीर म्हणजे, त्याने मुलीच्या आईसमोरच तिच्यावर चाकूने सात ते आठ वार केले. या सर्व घटनांचा मथितार्थ एकच आहे तो म्हणजे, मानवी संवेदना बोथट होत चालल्या आहेत. पृथ्वीतलावरील सर्व प्राण्यांमध्ये मनुष्यप्राणी श्रेष्ठ गणला जात असला तरी, त्याच्या या कृती पशुत्वापेक्षाही हीन आहेत. आरती हिच्या हत्येच्या वेळी आजूबाजूला लोक होते. त्यातल्या अनेकांनी बघ्याची भूमिका घेतली. वसईत डोळ्यादेखत गुन्हा घडत असताना एकाही व्यक्तीचे रक्त उसळले नाही, हे संवेदना गोठल्याचे निर्दशक आहे.

# शिक्षकच जर भ्रष्टाचार करत असतील तर...

शिक्षणाचे बाजारीकरण झाले आणि शिक्षणाच्या नावाखाली सर्वसामान्य लोकांची अक्षरशः लुट सुरू झाली. खाजगी शैक्षणिक संस्थेमध्ये खुप मोठ्या प्रमाणावर फि आकारून वर्ष भर वेगवेगळ्या इव्हेंट च्या नावाखाली पैशाची जमवा जमव करण्याचा प्रयत्न केला जातो. खाजगी शैक्षणिक संस्थेने किती ही फी गोळा केली तरी काही हरकत नाही असे आपण गृहीत धरू. कारण अनुदान नसल्याने कर्मचारी पगार, इमारत खर्च, दैनंदिन खर्च, आणि इतर किरकोळ खर्चासाठी पैसा आवशयक असतोच शिवाय खाजगी शैक्षणिक संस्थेला आपले स्टेटस टिकवण्यासाठी स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी चढाओढीने का होईना पण स्वच्छता, क्रिडा, मैदान आणि इतर गोष्टीवर खर्च करावा लागतो. खाजगी शैक्षणिक संस्थेमध्ये गोरगरीब विद्यार्थ्यांना प्रवेश देणे सर्व सामान्य लोकांना शक्यच नाही. आणि मुळात शिक्षणाची जबाबदारी हि सरकारची असल्याने प्रत्येक गावात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणासाठी शाळा आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळा म्हणजेच गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाचा मळाच होय. याच जिल्हा परिषदेच्या शाळेने अनेक विद्यार्थी घडवून त्यांच्या ज्ञानाचा फायदा देशासाठी होत आहे हे नाकारून चालता येणार नाही. आजची परिस्थिती बघितली तर खुप बिकट झाली आहे. जिल्हा परिषदेचे शिक्षणच शैक्षणिक भ्रष्टाचार करत आहेत असे बोलणे वावगे ठरणार नाही. अर्थात हा नियम सर्वच शिक्षणांना मुळीच लागु नाही. कारण आजही अनेक शिक्षक जिल्हापरिषदेच्या शाळेत मुलांच्या गुणवत्ता वाढण्यासाठी, इतर कलागुणांना वाव मिळण्यासाठी खुप मेहनत घेतात, स्वतः मुलांचे प्राथमिक शिक्षणही जिल्हा परिषदेच्या शाळेतच पुर्ण करतात. अशा मेहनती व विद्यार्थी व त्यांच्या गुणवत्तेची जाणीव असणाऱ्या शिक्षकांना खरचं सलाम. कारण अशा मेहनती शिक्षकामुळे आजही जिल्हा परिषदे शाळेच्या विद्यार्थ्यां मध्ये गुणवत्ता वृद्धिंगत तर होत आहे. पण हे विद्यार्थी पुणे मुंबई सारख्या ठिकाणी जाऊन ही आपल्या ज्ञानाचा ठसा उमटवत आहेत हे सर्व श्रेय त्या जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनाच आहे. शैक्षणिक भ्रष्टाचार नेमकं कशाला म्हणायचे तर नंबर एक म्हणजे गोरगरीब लोकांच्या मुलांना शिकवण्यासाठी शासनाकडून हजारो रुपये महिन्याला पगार स्वरूपात घ्यायचे आणि गरिबांच्या मुलांच्या शिक्षण व गुणवत्तेवर लक्षच द्यायचे नाही. आपण जेथे शिकवतो तेथे पगार चांगला घेतो परंतु चांगले शिकवु शकत नाही म्हणून काय स्वतः चे मुलं कधीच स्वतः च्या शाळेत टाकत नाही हा सर्वात मोठा शैक्षणिक भ्रष्टाचार होय. जर जिल्हा परिषद शाळेवर शिकवणाऱ्याच शिक्षकांचे मुल खाजगी शाळेत जात असतील तर त्याठी शिक्षण लोक गावातील विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद च्या शाळेसाठी कसे प्रेरित करतील? गावातील थोडे फार पैसे असणारे लोक शिक्षकांचेच मुल जिल्हा परिषद ला नाहीत म्हणून आपलेही मुल शिक्षकाच्या मुलांसोबत शिकायला पाहिजे म्हणून तेही खाजगी शाळेत टाकतात. आणि गावातील श्रीमंताची मुळे खाजगी शाळेत जातात हे पाहून जिल्हा परिषद मध्ये शिकणारे मुलं म्हणजे गरिबांची मुल असा उघड प्रचार आज झालेला आहे. म्हणून मोलमजुरी करणारा मजुरही आपण गरीब नाही, आपलेही मुल श्रीमंतांच्या शाळेत शिकायला पाहिजे म्हणून खाजगी शाळेत टाकतात. स्वतः ची कुवत नसताना ही जिल्हा परिषद मध्ये मोफत मिळणारे शिक्षण सोडून विद्यार्थी महाग शाळेत जात असतील तर सरकारचा पगार घेणाऱ्या जिल्हा परिषद शिक्षकांची भुमिका आणि जबाबदारी काय? यावर चर्चा होणार की नाही हा गहन प्रश्र्न आहे. जर जिल्हा परिषद च्या शिक्षकांनी चांगली गुणवत्ता देऊन खाजगीकरणातून होणारी लुट यावर जागृती केली तर जिल्हा परिषदेच्या शाळेचा दर्जा वाढून विद्यार्थांचा कलही वाढेल. आज जिल्हा परिषदेच्या शाळा बंद पडत आहेत, जिल्हा परिषदेच्या शाळेंविषयी लोकांच्या मनामध्ये नकारात्मक भावना निर्माण होत आहेत यासाठी शिक्षण काही प्रमाणात जबाबदार आहेत हे नाकारणारे खुप कमी लोक सापडतील. दुसरी आणि गंभीर गोष्ट म्हणजे जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांची संख्या खुप मोठी दाखवणे. परंतु वास्तविक पणे त्या शाळेमध्ये हजर तेवढे विद्यार्थी नसते. हि गंभीर बाब आहे. विद्यार्थी हजर नसुनही जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये दाखल असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षकांनी ओळखु नये, विद्यार्थ्यांनी शिक्षकांना ओळखु नये, एवढेच काय तर आपल्या मुलांचे नाव जिल्हा परिषदेच्या अमुक शाळेत आहे हेच पालकांना माहिती असु नये हि बाब गंभीर तर आहेच परंतु विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळणे आहे. सरकार ची दिशाभूल आहे. आणि विषेश म्हणजे शिक्षकाने ज्या शिक्षकांना आई वडीलांनंतर शिक्षकावर विश्र्वास ठेवला जातो, शिक्षकाला जिवनाचा शिल्पकार समजले जाते. अशा शिक्षकांनी विद्यार्थ्यांची शासनाची दिशाभूल केली तर समाजाने काय आदर्श घ्यायचा? शासनाकडून आलेल्या वेगवेगळ्या योजना, पोषण आहार, गणवेश, शालेय साहित्याचे काय? ते ज्यांच्या नावे आले त्यांना मिळत नसेल तर हा भ्रष्टाचार नाही का? आणि चुकिची पटसंख्या दाखवून नेमकं काय साध्य करायचे असते. शिक्षकाने असे भ्रष्ट कृत्य करणे म्हणजे शिक्षणाचा खेळ करून शिक्षणाची व विद्यार्थांची अवहेलना आहे. दरमहा हजारो रूपये पगार असताना खोटी पटसंख्या दाखवून त्यांच्या नावावरचे कपडे, बुट, पोषण आहार खाऊन प्रामाणिक शिक्षण होता येत नाही. ज्या विद्यार्थ्यांचा,विद्यार्थ्याच्या पालकांचा चेहराही ओळखिचा नसेल असे शिक्षक खरचं किती इमानदारीने आपले कर्तव्य बजावत असतील याची प्रचीती येते. अशा भ्रष्ट आणि कामचुकार काहीच शिक्षकामुळे बाकीचे शिक्षकही बदनाम होतात एकंदरीत शिक्षण बदनाम होते. म्हणून शिक्षकाने भ्रष्टाचार करणे हे कोणत्याही परिस्थितीत क्षमाशील नाहीच. शिक्षकांची ही मनमानी थांबण्यासाठी विद्यार्थ्यांना गुणवत्ता पुर्ण शिक्षण मिळण्यासाठी, जिल्हा परिषद व आदर्श शिक्षकांचा योग्य सन्मान होण्यासाठी नागरिकांनी जागृत होणे खुप आवश्यक आहे. आणि जिल्हा परिषद शाळेमध्ये चुकीचे काही घडत असेल आणि शिक्षक लोक शासनाची व जनतेची दिशाभूल करत असतील आणि त्याचे ठोस पुरावे असतील तर त्यांची तक्रार वरपासून खालपर्यंत करायला पाहिजे. तक्रार करताना तालुका जिल्हा अधिकारी यांना तक्रार नाही केली तरी चालते पण शिक्षण विभागाच्या संचालकाकडे तक्रार दाखल केली तर तपास निष्पक्ष होऊन चुकीचे काम करणाऱ्या शिक्षकांवर वचक निर्माण होईल. तालुका जिल्हा पातळीवर तक्रार केली तर काही वेळा शिक्षकांचे नातेवाईक, राजकीय हस्तक्षेप, किंवा तालुका जिल्हा अधिकार ही शिक्षकांच्या जवळचे असु शकतात. तपासामध्ये काही उणीवा राहु शकतात. म्हणून तक्रार ही संचालक, सचिव यांच्या कडे केली तर स्थानिक राजकीय किंवा प्रशासकीय सत्तेचा पाहिजे तसा हस्तक्षेप होणार नाही. आणि खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्षेत्रातील विषेशतः जिल्हा परिषद जो विद्यार्थ्यांचा पाया मजबूत करून आदर्श नागरिक, अधिकारी कर्मचारी घडवतो दर्जा सुधारुन सर्वसामान्य, गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले जाईल.



**विनोद पंजाबराव सदावर्ते,**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

## वृक्ष संवर्धन चळवळ काळाची

यासाठी तालुक्यातील सर्व मुख्याध्यापकांनी आपापल्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांचे प्रबोधन करून जास्तीत जास्त झाडे लावण्याचा संकल्प करणे ही सुद्धा तितकेच महत्त्वाचे आणि आवश्यक कार्य आहे

प्रत्येकाने निसर्गाला परमेश्र्वर म्हणून त्या निसर्गाच्या संवर्धनाच्या रूपाने त्यांची दैनंदिन पूजा करणे म्हणजेच निसर्गदेवतेला प्रसन्न करून घेण्याचा विधायक मार्गाने प्रयत्न असल्याचेही आमदार समाधान आवताडे यांनी यावेळी आवर्जून नमूद केले आहे सदर कार्यक्रमाप्रसंगी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर गटशिक्षणाधिकारी डॉक्टर भीषण रणदिवे व महाराष्ट्र माझा चे संपादक अविनाश सुर्वे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून आमदार अवताडे यांच्या संकल्पनेतून साकार होत असलेल्या समाजभिमुख चळवळीचा महत्त्वपूर्ण घटक होण्याची आव्हान केले आहे. या कार्यक्रमासाठी विविध मान्यवर तालुक्यातील विविध शाळेचे मुख्याध्यापक तालुका शिक्षण विभागातील पदाधिकारी आणि पर्यावरण प्रेमी उपस्थित होते

## वादळी चर्चेची चिन्हे; १८व्या

आघाडीकडून तशी मागणी लावून धरण्यात आली आहे. सरकारने याला सकारात्मक प्रतिसाद दिल्यास अध्यक्ष-उपाध्यक्षांची निवड बिनविरोध होऊ शकेल. मात्र विरोधकांनी उमेदवार देण्याचा निर्णय घेतला तर मोदी सरकारची तिसऱ्या कार्यकाळातील पहिली मोठी कसोटी ठरेल. नव्या लोकसभेत रालोआचे संख्याबळ २९३ तर 'इंडिया' आघाडीचे संख्याबळ २३१ आहे.

या लोकसभेत भाजपला स्वत:च्या बळावर बहुमत नाही. त्यामुळे रालोआ आघाडीतील घटक पक्षांना बरोबर घेऊन सरकारला मार्गक्रमण करावे लागणार आहे. त्यातही अनुक्रमे १८ आणि १२ जागा असलेले आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या भूमिका महत्त्वाच्या ठरणार असून सत्ताधाऱ्यांबरोबरच विरोधकांचेही त्यांच्याकडे लक्ष असेल.

## नोव्हेंबरनंतर महाराष्ट्रात

बदल होताना दिसत नाही. मी आणि उद्धव ठाकरे बैठका घेतो, फोन करतो त्यामुळे सध्याच्या मुख्यमंत्र्यांचं धाबं दणाणलं आहे. त्यामुळे ते नाशिकमध्ये फिरत आहेत. मात्र लोकांचा आता मुख्यमंत्र्यांवर विश्र्वास राहिलेला नाही. लोकसभा निवडणुकीने हे दाखवून दिलंय असंही संजय राऊत म्हणाले.

नोव्हेंबरनंतर महाराष्ट्रात आपलाच मुख्यमंत्री होणार आहे अशी घोषणा संजय राऊत यांनी आपल्या भाषणात केली. महाविकास आघाडीत मुख्यमंत्रिपदाची चर्चा, जागावाटप कसं होणार याची चर्चा हे काहीही घडलेलं नसताना संजय राऊत यांनी ही घोषणा केली आहे त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचवाल्या आहेत. संजय राऊत यांच्या या वक्तव्याची चर्चा होत असताना आता या वक्तव्याबाबत महाविकास आघाडीच्या नेत्यांमधूनही प्रतिक्रिया येण्याची शक्यता आहे.

## मराठा महासंघाची बैठक

कर्मी, वानियार यांनी आरक्षणाची मागणी लावून धरली आहे. देशातील नऊ राज्यांत आरक्षणाची मागणी आहे. समाज वंचित असून मर्यादा वाढवली तर सर्वांचे प्रश्न सुटतील. मराठा हे मोठे भाऊ, ज्या लहान भावाला चुकीने का होईना, ताटात काही दिले ते परत घेण्याचे आमच्या ध्येय धोरणात नाही. म्हणून आमची मागणी मर्यादा वाढवणे ही आहे. आम्हाला फडणवीसांनी निवडणुकीच्या अगोदर आश्र्वासन दिले आहे. म्हणून आम्ही आमची जी काही खारीची ताकद होती ती भाजपच्या मागे लावली, असे जगताप यांनी म्हटले.

मनोज जरांगे यांना आमचा शंभर टक्के आमचा जरांगे पाठिंबा आहे. ते जेव्हा जेव्हा मुंबईला येतात तेव्हा माझ्या कार्यालयात त्यांचा पाहुणचार ठरलेला असतो. दीडशे दोनशे कार्यकर्ते येतात, भेटी होतात. माझे म्हणणे आहे की, ५० टक्क्यांची मर्यादा सुटली की सर्वांचे प्रश्न सुटतील. माझे जरांगे भाऊंना, भुजबळांना आणि हाके बसलेत त्यांना देखील म्हणणे आहे की अरे इथे काय रडता? जो प्रश्न इथे सुटूच शकत नाही. लोकांच्या डोळ्यात धूळफेक करत आहात तुम्ही.

राज्य शासनाच्या हातात काही नाही. भुजबळ, हाके, जरांगे आणि मी आणि सगळे राजकीय पक्षांचे नेते म्हणजे शिंदे, अजित दादा सगळ्यांनी मिळून पंतप्रधानांना साकडे घाला. फक्त एक दिवसाचा प्रश्न आहे. आता अधिवेशन सुरू होत आहे. अधिवेशनात एक ठराव पारित करायचा आहे, तो राष्ट्रपतींकडे पाठवायचा आहे, राष्ट्रपतींकडून आला की अध्यादेश काढायचा आहे. मर्यादा पन्नास ऐवजी ७५ टक्के वाढवली तर देशातल्या सगळ्या वंचितांना आरक्षण मिळेल. पण काही स्वार्थी राजकारण्यांना तो नको आहे, म्हणून आमच्यात भांडणे लावायला कारण चाललं आहे. पण आम्ही भडकणार नाही, असे जगताप यांनी म्हटले.

काल वडेट्टीवारांनी एवढे अश्रू ढाळले. मात्र, मराठा आरक्षणासाठी गेल्या पाच वर्षामध्ये २०० मयत झाले आहेत, त्यांनी आत्महत्या केल्या, तेव्हा हरामखोर कोणी ओबीसीवाला अश्रू ढाळत आला नाही. आठ दिवस झाले हाके उपोषणाला बसले आहेत, तर डोळ्यात अत्तर टाकून आला होता की काय, असा प्रश्न मला त्याला विचारायचा आहे. काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षाला सांगायचे आहे, की याची ताबडतोब हकालपट्टी करा नाही तर पुढच्या निवडणुकीत समस्त मराठा समाज काँग्रेसच्या विरोधात मतदान करेल, असा इशाराही जगताप यांनी दिली.

छगन भुजबळांबद्दल द्वेष वाटण्याचे कारण शिवसेनेचा बॅनर होता, त्याखाली नव्वद टक्के मराठा होते. त्या मराठ्यांच्या विरोधात ते बोलताहेत म्हणून हा राग आहे, वैयक्तिक काही नाही. त्यांना मोठे करण्यासाठी कित्येकांनी अंगावर केसेस घेतल्या आहेत. ते फेटा बांधून बेळगावला जायचे की संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे, पण तीनशे मराठे अडकून पडले होते तेव्हा भुजबळ कुठे गेले होते? गेल्या पन्नास वर्षातला या राजकारणातला मी साक्षीदार आहे, असे म्हणत भुजबळांनाही लक्ष्य केले.

मुस्लिम आरक्षण हा गंभीर विषय आहे. कुणाला मुस्लिम हवेत, कुणाला नकोत, मला त्यात जायचे नाही. पण बाबासाहेबांच्या घटनेत सर्वांना समान हक्क दिला आहे तर त्यांना द्यायला अडचण काय, तो सर्वांना मिळावा. या देशात दोनच शासक जमाती झाल्या. एक मुस्लिम आणि एक मराठा. तिथे तर बापाला कापून राजे झाले. आपल्याकडे तसे नाही, आपल्याकडे संस्कार होते. घटनेप्रमाणे त्यांना जर मिळत असेल तर घटनेतले कायदे मुसलमान समाजाला लागू करा. नसतील मानायचे तर जा कुठेही. (मध्ये त्यांनी शरीयतचा उल्लेख केला) तुला अधिकार देतो पण तुला घटनेप्रमाणे वागावे लागेल.

माझा विश्र्वास आहे. जे सगळे मराठे नेते झाले आहेत, मग शरद पवार, अशोक चव्हाण, विलासराव म्हणा किंवा मागचे गेले ते सर्व... त्यांनी मराठा समाजाला काही दिले नाही. जे दिले ब्राम्हणांनीच दिले. मनोहर जोशींनी महामंडळ दिलं.. आरक्षण फडणविसानी दिलं, तो टिकलं नाही, पण ब्राम्हणानीच दिलं ना.. साडे चार हजार लोकांचे भले झाले.. त्या दोन वर्षात ख-ड , खझड, चझडउ मध्ये गेले ना त्या कालावधीत. ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी, आम्ही त्या संस्करातले आहोत. दरम्यान, आता आम्हाला मुंबईत ते (फडणवीस) भेटणार आहेत. त्यांनी जर आमचे काम केले तर आम्ही भाजपच्या पाठीशी, नाही तर आम्ही मोकळे, असेही बैठकीत सांगण्यात आले.

# ३० जूनपर्यंत महाराष्ट्रात जोरदार पावसाचा इशारा

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मान्सूनने आज संपूर्ण महाराष्ट्र काबिज केला आहे. सध्या मान्सूनचा काही प्रमाणात वावर हा घाटमाथ्यावर जाणवू लागला आहे. त्यामुळं आजपासून जूनच्या या शेवटच्या संपूर्ण आठवड्यात म्हणजे ३० जून पर्यंत महाराष्ट्रात मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता असल्याचे मत ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी व्यक्त केलं आहे. गेल्या पाच दिवसापासून म्हणजे १८ जूनपासून मुंबई शहर, उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात मान्सूनने जोरदार हजेरी लावली आहे. जूनच्या ह्या शेवटच्या आठवड्यात सुद्धा मुंबईसह संपूर्ण कोकणात जोरदार ते अति जोरदार पावसाची शक्यता ही अजुनही कायम टिकून आहे. तर मुंबई शहर, उपनगर, व कोकणात ह्या आठवड्यात काही ठिकाणी अतिवृष्टी होण्याची शक्यताही नाकारता येत नसल्याचे माणिकराव खुळे म्हणाले.

गेल्या चार दिवसापासून म्हणजे २० जूनपासून संपूर्ण विदर्भातील ११ जिल्ह्यात, पावसाने मध्यम ते जोरदारपणे हजेरी लावली आहे. मान्सून बंगालच्या उपसागरीय शाखेच्या सक्रियतेमुळं आता जूनच्या ह्या शेवटच्या संपूर्ण आठवड्यात सुद्धा संपूर्ण विदर्भात जोरदार पावसाची शक्यता ही कायम टिकून आहे.

मान्सून बंगालच्या उपसागरीय शाखात सक्रिय झाल्यामुळे मान्सून अरबी समुद्रीय शाखाही काहीशी उर्जीतावस्थेत आली आहे. त्यामुळे मान्सून साधारण एक किमी. उंचीचा सह्याद्री घाट चढून घाट माथ्यावर वावरतांना जाणवत आहे. त्यामुळे मान्सून खान्देश,

नाशिक नगर पुणे सातारा सांगली कोल्हापूर सोलापूर अशा १० जिल्ह्यात आजपासुन जूनअखेर पर्यंतच्या संपूर्ण आठवड्यात मध्यम ते जोरदार, पावसाची शक्यता जाणवते. नाशिक, नगर, पुणे व छत्रपती संभाजीनग अशा चार जिल्ह्यांच्या काही भागात जून अखेरपर्यंतच्या आठवड्यात, सरासरीपेक्षा, महाराष्ट्रातील उर्वरित भागाच्या तुलनेत, पावसाचे प्रमाण, काहीसे, कमी असण्याची शक्यता जाणवते असे खुळे म्हणाले.मराठवाड्यातील सर्व ८ जिल्ह्यात आजपासून पुढील चार दिवस म्हणजे २६ जूनपर्यन्त केवळ मध्यम पावसाचीच शक्यता आहे. तर २७ ते ३० जूनच्या चार दिवसात मात्र छत्रपती संभाजीनगर जिल्हा वगळता उर्वरित ७ जिल्ह्यात पावसाचा जोर वाढू शकतो. धाराशिव, लातूर अशा दोन जिल्ह्यात व लगतच्या परिसरात तर कदाचित आजपासूनच जोरदार पावसाची शक्यताही नाकारता येत नाही.

पेर झालेल्या पिकांना जीवदान, तर नापेर ठिकाणी पेर होण्याची शक्यता ह्या आठवड्यातील पावसाने मिळू शकते, असे माणिकराव खुळे म्हणाले. नजिकच्या काळात ह्यापेक्षा अधिक चांगल्या पावसाची शक्यता आहे. २९ जून ते ६ जुलै दरम्यानच्या आठवड्यात कदाचित महाराष्ट्रात अधिक चांगल्या पावसाची शक्यता जाणवते असे खुळे म्हणाले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# हायटेक इंग्लिश स्कूलमध्ये योग दिन साजरा




**उमरगा/दैनिक यशसिध्दि न्यूज**

योगा दिनाचे औचित्य साधून उमरगा तालुक्यातील येणेगुर येथील हायटेक इंग्लिश स्कूल येथे योगाचे महत्त्व सांगून विद्यार्थी व शिक्षकांना योगाचे प्रशिक्षण देण्यात आले. येणेगुर येथील हायटेक इंग्लिश स्कूलमध्ये २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका सरस्वती मोरे यांची उपस्थिती होती .यावेळी महालिंगरायवाडीचे योगाशिक्षक बालाजी खंडागळे व त्यांची मुले अजिंक्य खंडागळे व गणेश खंडागळे यांनी इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात शाळेतील विद्यार्थी व शिक्षकाकडून योगासन पूर्व हालचाली उभे राहून योगासने, बसून पाटीवर व पोटावरील विविध योगासने व प्राणायमाचे प्रात्यक्षिके करून मोलाचे योगदान दिले. विद्यार्थी, शिक्षक यानी योगा प्रशिक्षणास उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता. योगाशिक्षक बालाजी खंडागळे यांनी योगाचे व प्राणायामचे महत्व विशद केले.सांस्कृतिक विभाग प्रमुख स्मिता पोतदार यांच्यासह सर्व सहकारी शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# नाशिकमध्ये पत्रक काढुन दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्या षडयंत्राची सखोल चौकशी करावी : केंद्रीयराज्यमंत्री रामदास आठवले

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

नाशिकच्या काळाराम मंदिर परिसरात पत्रक काढुन दलित आणि सवर्ण या दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा निंदनीय प्रयत्न करण्यात आला आहे.दोन समाजात तेढ निर्माण करुन फुट पाडण्याचा प्रयत्न असणाऱ्या या प्रकरणाचा आपण तिव्र निषेध करित आहोत.या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करावी अशी मागणी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केली आहे.या पत्रकावर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची विटंबना करण्याच्या झालेल्या प्रकाराचा आम्ही तीव्र निषेध करित आहोत असे ना.रामदास आठवले म्हणाले.



नाशिकच्या काळाराम मंदिरात दलितांना प्रवेश आणि निळा झेंडा लावण्यास मनाई असणारे पत्रक काढुन दलित बौध्द आणि आंबेडकरी जनतेच्या तीव्र भावना दुखावल्या आहेत.दलित आणि आणि सवर्ण या दोन समाजात तेढ निर्माण करण्याच्या हेतुने संबंधीत वादग्रस्त पत्रक काढण्याचा समाजविधाक प्रयत्न झाला आहे.या समाजविघातक पत्रकाचा आम्ही रिपब्लिकन पक्षाच्या वतीने तीव्र निषेध करीत आहोत असे सागतानाच आंबेडकरी जनतेने संयम बाळगण्याचे आवाहनही ना.रामदास आठवले यांनी केले आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी काळाराम मंदिर प्रवेशाचा केलेला सत्याग्रह हा समतेच्या, मानवतेचा ऐतिहासिक लढा ठरलेला आहे.या पार्श्र्वभूमीवर काळाराम मंदिर परिसराबाबात काढण्यात आलेले पत्रक हे दलित सवर्णा मध्ये फुट पाड़ण्याचे षडयंत्र आहे.या षडयंत्राचा आम्ही तीव्र निषेध करित आहोत असे ना.रामदास आठवले म्हणाले.

# योग ही सातत्याने करण्याची क्रिया आहे : सुनील पुजारी

**वागदरी/एस.के.गायकवाड**

ज्ञानदीप कलोपासक मंडळ नळदुर्ग संचलित धरित्री विद्यालय आलियाबाद २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे मुख्याध्यापक महाराष्ट्र शासन राज्य पुरस्कार प्राप्त सुनील पुजारी, शाळेचे क्रीडाशिक्षक गोरख जगताप यांनी योग प्रात्यक्षिकांचे धडे गिरवले व सर्व विद्यार्थी सहभाग नोंदविला. सुनील पुजारी यांनी योगा ही सातत्याने करण्याची क्रिया आहे. शारीरिक, सुदृढता एका दिवसात प्राप्त होत नाही. शरीर, मन आणि बुद्धी यावर त्याचा सकारात्मक परिणाम होत असतो. दररोज किमान योगासने करण्याचा संकल्प केला पाहिजे असे मत प्रमुख अतिथी सुनील पुजारी यांनी मांडले. प्रास्ताविक युवराज होळे यांनी योग दिनाच्या बद्दल माहिती देत दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व अनन्य साधारण असल्याचे सांगितले.

ठराविक पद्धतीने श्र्वास नियंत्रित केला तर प्राणायामाचे फायदे मिळतात. त्यामुळे



दररोज योगा केला पाहिजे. विद्यार्थ्याकडून योगासने करून घेतली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी कारंजे यांनी केले. आभार सातलगावकर अण्णाप्पा यांनी मांडले. कार्यक्रम यशस्वी साठी रमेश चव्हाण, जगदेवी शंकर शेट्टी, विठ्ठल पाटील पालक विद्यार्थी उपस्थित होते.

# जगाच्या पोशिंद्याला दिला आधार; शेतीच्या मशागतीचा उचलला भार

## प्रणित मोरे पाटील लोकल्याण मंचची संकल्पना



**मंगरुळपीर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

भारतातील आकांक्षीत जिल्ह्यांच्या यादीमध्ये येत असलेल्या वाशिम जिल्ह्यामध्ये शेतकरी आत्महत्या काही नवीन नाही. सततची वाढती महागाई, शेतमालाला कमी भाव, शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांची कमतरता अशा अनेक समस्यांना तोंड देत अनेक शेतकऱ्यावर आत्महत्येची वेळ आली आहे. घरातील म्होरका माणूस गेल्यावर कुटुंब देशोधडीला लागतं आणि अशात त्याला गरज असते थोड्या आधाराची. लोकनेते वसंतराव नाईक यांची हरितक्रांतीची भूमिका पुढे नेण्यासाठी वाशिम जिल्ह्यातील मानोरा तालुका येथील

**तालुक्यातील आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबाला मोफत बियाणे वाटपाचा उपक्रम.**

प्रणित मोरे पाटील लोककल्याण मंचने अशा कुटुंबांना आधार देण्याचा मानस केला.

युवा नेतृत्व प्रणित मोरे पाटील यांनी आपल्या दानशूर वृत्तीचे दर्शन देत अनेक आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शेतीच्या मशागतीसाठी लागणारे बी बियाणे मोफत उपलब्ध करून दिले त्यांच्या या उपक्रमाचे पंचक्रोशीत कौतुक होत आहे. त्यांच्या या उपक्रमामध्ये प्रशासनाने देखील हजेरी लावली

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात जागतिक योग दिवस साजरा



**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय व मातोश्री गुरूबसव्वा कल्याणशेट्टी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने २१ जून २०२४ रोजी जागतिक योग दिनानिमित्त शिक्षक व विद्यार्थी यांचा भव्य योग शिबीर घेण्यात आला.


प्रथम संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते भारतमाता प्रतिमेचे पूजन करण्यात आले. योग शिक्षक चंद्रकांत बिराजदार यांनी निरोगी जीवनासाठी योग व प्राणायाम चे महत्व या विषयावर विदयार्थ्याना मार्गदर्शन केले. तद्रंतर सेमी विभागातील प्रशिक्षीत विद्यार्थ्यानी स्टेजवर प्रात्यक्षिक करत असताना त्यांच्याबरोबर उपस्थित विद्यार्थ्यांनी प्राणायाम व योगाची सर्व आसने करत होते.

जागतिक योग दिन व वटपौर्णिमा निमित्त संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी यानी पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकानी एक झाड लावले पाहिजे, असा संदेश देऊन विविध प्रकारचे सुमारे २५० झाडांच्या रोपांचे उपस्थित विद्यार्थ्याना व शिक्षकाना मोफत वाटप केले. यावेळी मातोश्री गुरूबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्या एन एस एस विभागाकडून वृक्षारोपण करण्यात आला.याप्रसंगी संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी, सीईओ रूपाली शहा, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख पूनम कोकळगी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप,प्राथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे, सेवानिवृत्त शिक्षक खंडेराव घाटगे, शिवानंद पुजारी आदी मराठी, कन्नड, सेमी विभागाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर वृंद उपस्थित होते.

# माता रमाई आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी धम्मदान देण्याचे आव्हान

**कलयाण/ठाणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

आंतरराष्ट्रीय स्थळ बुद्ध भूमी फौंडेशन, अशोकनगर, वालधुनी, कल्याण येथे त्यागमूर्ती माता रमाई (आंबेडकर) यांचे भव्य स्मारक उभारण्याचं काम बुद्ध भूमी फौंडेशनचे संस्थापकीय अध्यक्ष भदंत गौतमरत्न महाथेरो ह्यांच्या मार्गदर्शनाखाली बौद्ध विहार संघटना समन्वय समिती ठाणे यांच्या माध्यमातून संपन्न होत आहे. या स्मारकाचा लोकार्पण सोहळा दि. ७ फेब्रुवारी २०२५ रोजी माता रमाईंच्या जयंतीदिनी करण्याचे ठरवले असून स्मारक निर्माण कार्यासाठी ४५ ते ५० लाखाचा निधी अपेक्षित आहे.




माता रमाई आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी धम्मदान देण्याचे आव्हान बौद्ध विहार संघटना समन्वय समितीने केले आहे. समाजातील दानशुर रमाईच्या लेकरांना जमेल तसे दान करावे धम्मदान आणि स्मारकाबाबदल अधिक माहितीसाठी आपण इं. गौतम बस्ते ८३०८२७१०७ , नवीन गायकवाड ९२२३४५१४२० , रोहिणीताई जाधव ९९८७४७०९६७ यांच्याशी संपर्क साधावा असे आव्हान करण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनात माता रमाईचे अनन्य साधारण महत्त्व आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे रमाबाईंवर निस्सीम प्रेम होते, त्यांनी आपला ‘थॉट्स ऑन पाकिस्तान’ हा ग्रंथ आपल्या ‘प्रिय रामू’ला अर्पण केला. अर्पणपत्रिकेत बाबासाहेबांनी लिहिले आहे की, ‘‘तिच्या हृदयाचा चांगूलपणा, मनाची कुलीनता आणि शीलाच्या पावित्र्यासह तिचे शालीन मनोधैर्यनी माझ्याबरोबर दुःख सोसण्याची तिची तयारी अशा दिवसांत तिने मला दाखविली- जेव्हा मी नशिबाने लादलेला मित्रविरहित काळ चिंतेसह कंठीत होतो.

अशा त्यागमूर्ती माता रमाईचे बुद्ध भूमी येथे बनणारे स्मारक येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणादायक असणार आहे. रमाईच्या असीम त्यागाला महाराष्ट्रातील रमाईंची लेकरं आपल्या आईला ह्या स्मारकाच्या माध्यमातून अभिवादन करणार आहेत.

# पंढरपूर भुयार गटार योजनेसाठी १२१ कोटी मंजूर करावेत माजी.आ. प्रशांत परिचारक यांची मागणी

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर भुयारी गटात योजनेसाठी १२१ कोटी रुपये मंजूर करावेत अशी मागणी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी केली आहे याबाबत प्रस्ताव पंढरपूर नगरपरिषदेने तयार करून शासनाकडे पाठविला आहे महाराष्ट्रातील राज्यातील पंढरपूर अत्यंत महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन काळातील राज्यातील वर इतर राज्यातील लाखो भाविक दरवर्षी आषाढी कार्तिकी मागी व चैत्री या चार यात्रे कालावधीमध्ये येत असतात दररोज ५० ते ६०००० भाविक देखील हजेरी लावत असतात तसेच पंढरपूर सह उपनगर विकसित होत असून वाढती लोकसंख्या पाहता भुयारी गटारे क्रमांक चार मध्ये गरजेचे आहे यापूर्वी पंढरपूर शहरात शासनाने भुयारी गटार योजना तीन टप्पे राबविल्या असून त्यानुसार भुयारी गटावर योजना टप्पा क्रमांक चार साठी केंद्र शासन पुरस्कृत स्वच्छता महाराष्ट्र अभियान दोन अंतर्गत पंढरपूर भुयार गटार योजनेसाठी १२१.६९ कोटीचा डी पी आर बनवून प्रस्ताव तांत्रिक मंजुरी करिता महाराष्ट्र जेवण प्राधिकरण यांच्याकडे सादर केलेला आहे नव्या भुयारी गटावर योजना टप्पा क्रमांक चार मध्ये टाकळी गणेश नगर कासेगाव रोड येथील कोर्टी परिसर गावठाण परिसरातील कामे प्रामुख्याने होणार आहेत परंतु मागील काही महिन्यापासून आचारसहिता असल्यामुळे या प्रस्तावाला रखडला हो रखडला होता आता भुयारी गटार योजनेचा टप्पा क्रमांक तातडीने राज्यस्तरीय मंजुरी देण्यात यावी अशी मागणी माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व तसेच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे मागणी केली आहे

# भैय्यासाहेब जगताप यांच्या तक्रारीची दखल

## कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाने केली विद्यार्थ्यांची शिक्षण फी परत....!

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष ०२०-२१, ०२१-२२ मधील अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांकडून नियमबाह्य इतर शुल्क आकारले होते. यासंदर्भात विद्यार्थ्यांनी सोलापूर जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते भैय्यासाहेब तानाजी जगताप यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. याप्रकरणी जगताप यांनी सोलापूर जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त यांच्याकडे कारवाई ची मागणी केली होती. यावर तात्काळ सहाय्यक आयुक्तांनी महाविद्यालयाला नोटीस बजावत खुलासा मागितला व कायदेशीर कारवाई चा इशारा दिला होता. महाविद्यालयाने चूक मान्य करत ही बाब नजरचुकीने झाल्याचे स्पष्ट केले व विद्यार्थ्यांना शिक्षण फी परत करत असल्याचे जाहीर केले आहे व फी परत करण्याची प्रक्रिया महाविद्यालयाने सुरु केली .



शासन निर्णयानुसार अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश फी व इतर फी घेऊ नये असे नियम आहेत तरीही काही महाविद्यालय अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकडून नियमबाह्य शुल्क वसूल करतात ही बाब गंभीर आहे. याबाबत सहाय्यक आयुक्तांनी नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे असे मत सा. कार्येकर्ते भैय्यासाहेब तानाजी जगताप यांनी व्यक्त केले.

# प्रहार संघटनेच्या वतिने पंढरपूर येथे रक्तदान शिबिर संपन्न

**पंढरपूर/ संतोष मोरे**

प्रहारचे संस्थापक आ. बच्चुभाऊ कडु यांच्या संकल्पनेतुन महापुरुषांना रक्तदान करून अभिवादन करण्यासाठि संपुर्ण महाराष्ट्रात प्रहार संघटनेच्या वतिने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.मतदान झाले आता रक्तदान अशी संकल्पना अमलात आणली. त्या संकल्पनेला साथ देत प्रहार संघटनेच्या वतिने पंढरपूर येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. या वेळी प्रहारचे जिल्हा अध्यक्ष दताभाऊ मस्के,म. रा. पत्रकार संघाचे



कार्याध्यक्ष राजेंद्र कोरके, रामदास नाग टीळक,संतोष पवार, रणजित जगताप, दत्ताभाऊ चौघुले, संजय जगताप, बालाजी फुगारे, राजेंद्र सावंत,पांडूरंग पडगळ, संतोष मोरे, राहुल गाडे, उमेश घोडसे, गणेश ननवरे, हणुमंत चव्हाण,आनंद गुरव इत्यादि मान्यवर व प्रहार सैनिक मोठ्या उपस्थित होते. हे शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठि पंढरपूर ब्लड बॅकेचे डॉ.खाडिलकर व त्यांचे सहकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

दैनिक यश सिद्धि न्यूज



# जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब संवर्गातील ६७० पदांसाठीची फेरपरीक्षा जुलै महिन्यात

**मुबंई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब संवर्गातील ६७० पदांसाठीच्या फेरपरीक्षा जुलै महिन्यात घेण्यात येणार आहे. ही परीक्षा अधिक पारदर्शक, कोणत्याही तांत्रिक त्रुटींशिवाय पार पडावी, असे निर्देश मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिले.मृद व जलसंधारण विभागाच्या जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब संवर्गातील ६७० पदांसाठीची फेरपरीक्षा आढावा बैठक मंत्रालय मध्ये आयोजित केली होती त्यावेळी मंत्री श्री. राठोड बोलत होते. यावेळी मृद व जलसंधारण विभागाचे सचिव गणेश पाटील, टि.सी.एस. कंपनीचे संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील जलसंधारण अधिकारी, (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या संवर्गातील ६७० पदे सरळसेवेने भरण्यासाठी दि.१९ डिसेंबर २०२३ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर परीक्षा ही शासन मान्य टि. सी. एस. या कंपनीमार्फत, राज्यातील २८ जिल्हयातील निश्रि्चत केलेल्या एकूण ६६ केंद्रांवर दि.२० व दि.२१ फेब्रुवारी २०२४ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आली होती.

या परीक्षेदरम्यान दि.२१ फेब्रुवारी २०२४ रोजी नांदगाव पेठ, अमरावती शहर येथील परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्याचे निदर्शनास आले. परिक्षार्थी यांनी याबाबत व्यक्त केलेल्या तीव्र भावनेचा विचार करुन दि. २० व २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी घेण्यात आलेली परीक्षा शासन मान्यतेने रद्द करण्याचा निर्णय दि.१५ मार्च २०२४ रोजी घेण्यात आलेला होता.

या प्रस्तावित ६७० पदभरतीसाठी संभावित दि.१४, १५ व १६ जुलै २०२४ या कालावधीत फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. परीक्षा अधिक पारदर्शक व्हावी यासाठी राज्यातील मुंबई, पुणे, कोल्हापूर, अमरावती, नागपूर, नांदेड, छत्रपती संभाजीनगर या सात शहरांतील एकुण दहा टिसीएस-आयओएन या कंपनीच्या अधिकृत केंद्रावरच घेण्यात येणार आहे. परीक्षार्थींनी वेळोवळी अधिकृत केंद्रावर परीक्षा घेण्याची मागणी सोशल मीडियाच्या माध्यमातून केली आहे. परीक्षेचे वेळापत्रक, प्रवेशपत्र इ. बाबत सर्व उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार आहे. पूर्ण सुरक्षित तंत्रांज्ञानासह जिल्हाधिकाऱ्यांच्या निरीक्षणाखाली ही परीक्षा होणार आहे. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडून आल्यास संबंधितास जबाबदार ठरवून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, असेही मंत्री श्री. राठोड यांनी यावेळी सांगितले.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची ठाणे, रायगड जिल्ह्यातील हातभट्टी दारू निर्मिती केंद्रांवर धाड

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी हातभट्टी दारुचे समूळ उच्चाटन करण्यासाठी २२ जून रोजी राबविलेल्या धाडसत्र मोहिमेमध्ये स्वतः सहभागी होत ठाणे जिल्ह्यातील मौजे अलिमघर, दिवा, घेसर, खरडर्डी, छोटी देसाई, मोठी देसाई, मानेरे गांव, कालवार, भिवंडी, कोरावळे, शहापुर, कुंभारली व रायगड जिल्ह्यातील काही गांवामधील हातभट्टी दारू निर्मीती केंद्रांवर धाडी टाकून उध्वस्त केली.

या कारवाईमध्ये ठाणे जिल्ह्यात १ वारस व २३ बेवारस असे एकुण २४ गुन्हे नोंदविले आहेत. यामध्ये ५९५ लिटर हातभट्टी दारु, ६९ हजार २०० लिटर रसायन व इतर भट्टी साहित्य असा एकूण २६ लाख ७२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला. मोहिमेमध्ये उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. सुर्यवंशी यांनी कोकण विभागाचे उप आयुक्त व ठाणे जिल्ह्याचे अधिक्षक यांच्या समवेत स्वतः तीन बोटी मधून मौजे अलिमघर, दिवा, अंजुर खाडीतील हातभट्टी दारू निर्मीती ठिकाणे उध्वस्त केली. तसेच रायगड जिल्ह्यातील पथकाने एकूण ८ गुन्हे नोंदवून एकूण ४ लाख ६७ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला. या कारवाईत १३० अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला.नोंदविलेल्या सर्व बेवारस गुन्ह्यातील आरोपींवर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत व आय.पी.सी. कलम ३२८ अन्वये तसेच एम.पी.डी.ए. कायद्यानुसार कारवाई करण्याच्या सूचना आयुक्त डॉ. सुर्यवंशी यांनी दिल्या.या कारवाईमध्ये विभागीय उप आयुक्त प्रदीप पवार, ठाणे जिल्ह्याचे अधीक्षक डॉ. निलेश सांगडे, उपअधीक्षक वैभव वैद्य, डोंबिवली, मुंबई उपनगर, मुंबई शहर, कल्याण, अंबरनाथ, भिवंडी, उल्हासनगर विभागाचे निरीक्षक, कर्मचारी तसेच त्यांच्या भरारी पथकांचा समावेश होता.

# दुधनी येथील सामाजिक कार्यकर्ते आजम शेखजी यांच्यातर्फे मुस्लिम ओबीसी दाखला मोफत वाटप




**दुधानी/दैनिक यशसिध्दि न्यूज**

दुधनी येथील सामाजिक कार्यकर्ते आजम शेखजी यांच्यातर्फे दुधनी येथील शाळकरी विद्यार्थ्यांना व नोकरीसाठी शैक्षणिक व शासकीय कामासाठी जात दाखला मिळवण्यासाठी लागणारे मुस्लिम व मागासवर्ग समाज दाखला (ओबीसी दाखले) बनवून अक्कलकोट तालुका काँग्रेस अध्यक्ष शंकर म्हेत्रे याच्यां हस्ते मोफत वाटप करण्यात आले.

या वेळी अक्कलकोट तालुका काँग्रेस अध्यक्ष शंकर मालक म्हेत्रे,मुस्लिम समाजाचे ज्येष्ठ नागरीक झाकीर अत्तार , तोला गुलबर्गा ,सैदप्पा आण्णा झळकी,गोरखनाथ धोडमनी , अल्लाउद्दीन नदाफ, मेदीमिया जिडगे,काशिम खैराट,इमामशा मकानदार,इमाम बळूर्गी ,मुस्तफा शेखजी, सैफन बडेखा,हकीम चौधरी ,रसूल मुकादम, अल्लाउद्दीन नदाफ ,इब्राहिम अत्तार, महीबुब बिलाड, वसीम बडेखा, जाविद इंगळगी,अशपाक मुजावर, मेहराज जिडगे,अल्लाबक्ष जिडगे,अहमद शिकलगार, महीबुब शेखजी,साहील शेखजी,दाऊद नदाफ ,सैफन नदाफ,अशपाक शेखजी, शब्बीर मणुर आदी जन उपस्थित होते.

# माजी जि.प.विरोधी पक्ष नेते मनोज कायंदे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य मॅरेथॉन स्पर्धा संपन्न

**बुलढाणा / राहुल साबळे**

सिंदखेड राजा विधानसभा मतदारसंघाच युवा नेतृत्व मनोज देवानंद कायंदे महासचिव महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस तथा मा.विरोधी पक्षनेते जि प बुलढाणा यांच्या वाढदिवसाच्या निमित्त भव्य मॅरेथॉन स्पर्धा २०२४ संपन्न झाली.



युवकांमध्ये दैनंदिन जीवनामध्ये सुदृढ व निरोगी राहण्यासाठी व्यायाम, उत्तम आहार व निर्व्यसनी राहणे खूप गरजेचे असते. याच सर्व गोष्टींची जनजागृती व्हावी यासाठी या भव्य स्पेर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.

या स्पर्धेमध्ये मोठ्या संख्येने स्पर्धकांनी सहभाग नोंदवून आपल्या धावण्याच्या कौशल्याचे प्रदर्शन केले या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक रोहित वैद्य द्वितीय क्रमांक गणेश बाम्हणे तर तृतीय क्रमांक गौरव भराड यांनी पटकावला तर प्रथम ५० स्पर्धकांना आकर्षक टी-शर्ट चे वाटप करण्यात आले व स्पर्धेमध्ये सहभागी सर्व स्पर्धकांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले या स्पर्धेसाठी विशेष सहकार्य करणारे पोलीस विभागाचे सर्व कर्मचारी आरोग्य विभागाचे कर्मचारी व पत्रकार बांधवांचे आयोजकांनी विशेष आभार मानले तसेच पंच म्हणून नंदू सोसे सर कमांडो चेके सर भीमराव चाटे मा.सैनिक यांचे ही आभार व्यक्त करण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभासाठी काँग्रेस चे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन लंगोटे डॉ. काबरा हाजी सिद्धी शेठ सुभाष दराडे लक्ष्मण कव्हळे गणेश डोईफोडे प्रा सपाटे सर वाडेकर सर अशोक डोईफोडे सुनील खांडेभराड राजू नाडे सुखदेव शिरसाठ यश कासारे राहुल धाटे रईस सर मुन्ना ठाकुर सत्यनारायण पावले भीमराव काकडे गणेश आडे निखिल जायभाये मदन आघाव सय्यद इजाज मोहम्मद शेख दीपक चेके ऋषिकेश आंधळे संजय जायभाये गोपाल शेळके सचिन मुंडे संतोष काकड गणेश मुंडे आदी असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष गजानन काकड शहराध्यक्ष विष्णू झोरे, प्रा.दिलीप सानप,हनीफ शहा,गजानन तिडके,नझिम भाई यांनी प्रयत्न केले.

# जिल्ह्यातील १ हजार ९१० आशा सेविकांचे मोबाईल सुविधेतून सक्षमीकरण

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात वितरण

**नागपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जिल्ह्यातील १३ तालुक्यातील प्रत्येकी एका आशा स्वयंसेविकेला प्रातिनिधिक स्वरूपात आज मोबाईल फोनचे वितरण करण्यात आले. प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण प्रतिष्ठान यांच्या सौजन्याने जिल्ह्यातील ग्रामीण भागात कार्यरत १ हजार ९१० आशा सेविकांना मोबाईल फोन सुविधेच्या माध्यमातून आता अधिक सक्षम केले जात आहे.देवगिरी शासकीय निवासस्थानी यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमास आमदार टेकचंद सावरकर, आमदार आशिष जयस्वाल, जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा यांच्यासह जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते

ग्रामीण भागातील आशा सेविका या आरोग्य विभागाचा कणा आहेत. आधुनिक युगात आता शासकीय कामकाजाशी निगडीत अनेक अहवाल, लाभार्थी नोंदणी हे ऑनलाईन पद्धतीने तथा प्लिकेशनच्या माध्यमातून करणे क्रमप्राप्त झाले आहे. या कामांमध्ये आशा सेविकांना तत्परतेने काम करण्यास मदत होण्याच्या दृष्टीने त्यांना आधुनिक अँड्राईड मोबाईल देण्यात येत आहेत. प्रधानमंत्री मातृवंदन योजना, यू विन पोर्टल, आयुष्यमान भारत ई-कार्ड, आभा कार्ड तसेच अन्य ऑनलाईन कामे आता आशांना या मोबाईलच्या मदतीने करणे सुलभ होईल.यासाठी खनिज क्षेत्र कल्याण योजने अंतर्गत सुमारे १ कोटी ९० लक्ष ९८ हजार ९० रूपये निधी आरोग्य व्यस्थापन सुविधेसाठी उपलब्ध करण्यात आला आहे.नागपूर जिल्ह्यातील सावनेर, कळमेश्र्वर, मोदा, कामठी, हिंगणा, नागपूर, पारशिवनी, रामटेक, उमरेड, कुही, भिवापूर, नरखेड व काटोल या १३ तालुक्यात आशा स्वयंसेविकांच्या माध्यमातून कामांना गती मिळेल.

# नाशिक काळाराम मंदिर येथील निंदनीय घटनेचा नळदुर्ग येथे रिपाइं(आठवले) च्या वतीने जाहीर निषेध

**वागदरी/एस.के.गायकवाड**




नाशिक येथील काळाराम मंदिर परिसरात निळा पिवळा झेंडा लावू नये, मंदिर परिसरात व पंचवटीत मागासवर्गीयानी फिरकू नये तसं आढळून आल्यास होणाऱ्या परिणामास सामोरे जावे लागते असा मजकूर लिहून पत्रक काढून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटो वर लाल रेघा मारून त्यांचा अवमान करून दोन समाजात भांडण लावण्याचा प्रयत्न करण्याचा निंदनीय प्रकार घडला असून या निंदनीय घटनेचा नळदुर्ग ता.तुळजापूर येथे रिपाइं (आठवले) च्या वतीने जाहिर निषेध करण्यात आला.

या निंदनीय घटनेच्या निषेधार्थ रिपाइं (आठवले) नळदुर्ग शहर शाखेच्या वतीने येथील पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्रीमती मस्के मॅडम यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की हिन्दू युवा वहीनी च्या लेटरहेड वर मागासवर्गीयांच्या विरोधात काढण्यात आलेले पत्रकात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेवर लाल साहीच्या पेनने रेघा ओढून त्यांचा अवमान करून महार,मांग, चांभार,ढोर या मागासवर्गीय समाजातील लोकांनी नाशिक पंचवटी परिसरात फिरू नये मंदिर परिसरात निळा पिवळा झेंडा लावू नये अन्यथा परिणाम भोगावे लागतील असे जाणिवपूर्वक पत्रक काढून समाजात जातीय तेड निर्माण करून भांडण लावण्याचा निंदनीय प्रकार घडला या निंदनीय घटनेचा निषेध करण्यात येत असून संबंधित गुन्हेगारावर कडक कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

रिपाइं (आठवले) च्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनावर रिपाइं चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, जिल्हा सचिव एस.के.गायकवाड, रिपाइं अल्पसंख्याक आघाडीचे तालुकाध्यक्ष बाशिदभाई कुरेशी, रिपाइं नळदुर्ग शहराध्यक्ष मारुती खारवे, दलित पँथरचे जिल्हा संपर्क प्रमुख शामकांत नागीले, युवा कार्यकर्ते अजिंक्य मस्के,यल्लाप्पा नागीले, जेष्ठ कार्यकर्ते नामदेव आण्णा बनसोडे,येडोळा शाखा प्रमुख देवानंद लोंढे सह कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.

# महामार्गाला विरोध करावाच लागेल तरच जमीनी राहतील तर समोरच्या पेरण्या होतील

**बुलढाणा/ राहुल साबळे**

बुलढाणा जिल्ह्यातून भक्ती महामार्ग हा सिंदखेडराजा तालुका चिखली तालुका आणि खामगाव तालुक्यातून १०९ किलोमीटरचा होऊ घातला आहे त्यामुळे शेतकऱ्याची काळी कसदार जमीन ही भक्ती महामार्गामध्ये जात आहे त्यामुळे शेतकरी हा देशो धडीला लागणार आहे त्यामुळे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आमदार राहुल बोंद्रे यांनी दिनांक २३ जुन २०२४ रोजी एक दौरा आयोजित केला होता त्यामध्ये त्यांनी कवठळ गांगलगाव अंत्रीखेडेकर अंबाशी एकलारा पांढरदेव या ठिकाणी शेतकऱ्यांना भेटी देऊन त्यामध्ये मार्गदर्शन केले त्यामध्ये त्यांनी सांगितले



की जर शेती राहिली तर पेरणी होईल जर पेरणी करायची आसेल तर या भक्ती महामार्ग ला विरोध करा आपल्या शेतकऱ्याला शेती नसेल तर आपल्याला आणि आपल्या मुलाबाळांना देशदडीला लागल्याशिवाय पर्याय नाही हा मार्ग हा शेतकरी देशोधडीला लावणारा मार्ग आहे या महामार्गामुळे मुंबई पूणे येथील बाहेरील भक्तांना जाण्यासाठी शेगाव जाण्यासाठी बरेच मार्ग असताना सुद्धा शासनाने भक्ती महामार्गाचा घाट घातला आहे त्यामध्ये हजारो एकर शेती या भक्ती महामार्ग मध्ये जात आहे आणि त्याला शेतकऱ्याचा पूर्णतः विरोध आहे विरोध असून सुद्धा शेतकऱ्यांना नोटीस मिळाले आहेत आणि हा भक्ति महामार्ग होऊन शेतकऱ्यांना कोणताही फायदा होणार नाही आणि या बदल्यात शेतकऱ्यांना रेडीरेखनाच्या दुप्पट पैसे भेटणार आहेत अंत्रीखेडेकर येथे लोकांना संबोधित करत असताना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आमदार राहुल बोंद्रे यांनी शेतकऱ्यांना सांगितलं जर आपल्याला शेती पेरणी करणे असेल तर या महामार्गाला विरोध करणे आवश्यक आहे तसेच अंत्रीखेडेकर येथील एका शेतकऱ्याने तर एवढे पाच हजार कोटी जर या रस्त्यासाठी सुरुवातीचे बजेट आहे तर यापेक्षा सिंदखेडराजा ते शेगाव येथे विमानतळ बांधा आणि ज्या भक्तांना आवश्यक आहे त्यांनी विमान मार्गे प्रवास करा व परंतु आमच्या काळी कसदार जमीन आम्ही या भक्ती महामार्गासाठी देणार नाही असे सुद्धा माहिती दिली आहे सदर दौऱ्यामध्ये गांगलगाव अंत्रीखेडेकर अंबाशी एकलारा पांढरदेव येथे चांगला प्रतिसाद मिळाला आहे येत्या एक तारखेला सोमवारी बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालय समोर लाक्षणिक उपोषण करून दोन तारखेला मुंबईकडे काही शेतकरी हे मंत्रालय येथे रवाना होणार आहे यामध्ये मेरा बुद्रुक जिल्हा परिषद सर्कलचे माजी जिल्हा परिषद सदस्य अशोकराव पडघान कॉटन मार्केट चे सभापती डॉक्टर वानखेडे ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष डॉक्टर सत्येंद्र भुसारी विकास लहाने मेरा बुद्रुक येथील कुमठे गुरुजी तसेच प्रत्येक गावातील शेकडो कार्यकर्ते हजर होते